संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक ९५/२०२०
अनिल दत्तात्रेय तेंडूलकर वि. मंगेश दामोदर मुंढे
नि.क्र.१४

## रोहा येथील प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, रोहा जिल्हा रायगड यांच्या न्यायालयात

## (पिठासीन अधिकारी एस्. डी. कमलाकर)

| | | |
|---|---|---|
| १ | गुन्हा घडल्याची तारीख | नोटीस मिळाल्यानंतर पंधरा दिवसांपासुन पुढे. |
| २ | फियार्द दाखल केल्याचा दिनांक | १५.०६.२०२०. |
| ३ | फिर्यादी | अनिल दत्तात्रेय तेंडूलकर, वय ६० वर्षे, धंदा – व्यापार, रा. एकविरा नगर, वरसे, ता. रोहा, जि. रायगड. |
| ४ | आरोपीचे नाव वय व पत्ता | मंगेश दामोदर मुंढे, वय ४५ वर्षे, धंदा बिल्डर, रा. एकविरा विला, रोहा पब्लीक स्कुलचे मागे, भुवनेश्वर, पो. वरसे, ता. रोहा, जि. रायगड. |

५ आरोपीस सांगावयाचे विवरण

तुम्ही फिर्यादीच्या नावे तुमच्या आय. डी. बी. आय. बँक, शाखा रोहा, येथील खाते क्र.१५९७१०४००००१२३५१ या वरील दिनांक ११.०३.२०२० रोजीचा धनादेश क्र.०४८५९२, रक्कम रुपये ३,००,०००/– (तीन लाख मात्र) फिर्यादीचे कर्ज/देणे फेडण्याची कायदेशीर जबाबदारी पूर्ण करण्यासाठी सदर धनादेश वटेल अशी हमी देवून दिला, फिर्यादीने सदर धनादेश स्टेट बँक ऑफ इंडीया, शाखा रोहा येथील त्याच्या खात्यात वटण्यासाठी जमा केला असता तो तुमच्या खात्यात 'अपुरा निधी' या कारणास्तव सर्वात शेवटी दि.१७.०४.२०२० रोजी न वटता परत

आला. फिर्यादीने त्याच्या विधीज्ञांमार्फत दि.०४.०५.२०२० रोजी नोटीस तुम्हाला नोंदणीकृत पोष्टाने पाठविली ती नोटीस तुम्हाला दि.०६.०५.२०२० रोजी मिळाली. तुम्हाला नोटीस मिळूनही तुम्ही पुढील १५ दिवसात धनादेशाची रक्कम फिर्यादीला देण्यास कसूर केला व त्याद्वारे चलनक्षम दस्तऐवज अधिनियम, १८८१ चे कलम १३८ अन्वये दंडनीय अपराध केला.

आणि मी याद्वारे तुमच्याविरुध्द वरील अपराधाकरीता खटला चालवण्याचे निर्देश देतो.

आरोपीला अपराधाचे विवरण त्याच्या भाषेत वाचून व समजावून सांगीतले.

६ आरोपीचे प्रतिकथन –

१. तुम्हाला आरोपपत्र व संपूर्ण कागदपत्रांच्या नकला मिळाल्या आहेत काय?
उत्तर– होय.

२. तुम्हाला समजावून सांगीतलेला उपरोक्त गुन्हयाचा तपशील समजला आहे काय?

उत्तर– होय.

३. तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय?
उत्तर– मला गुन्हा कबूल नाही.

दिनांक – १९–०१–२०२१

Digitally signed by Sameer Dilip Kamalakar
Date: 2021.01.19 14:30:23 +0000

आरोपीची सही (स. दि. कमलाकर)

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, रोहा.